## प्रेसनोट

**खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड पथकाकडुन एका सराईत आरोपी व त्याचेसह अरुण गवळी यांची आखिल भारतीय सेनेचा खेड तालुका अध्यक्ष याना अटक करून, ०२ देशी बनावटीची पिस्टल व ०४ जिवंत राऊंड जप्त.**

मा.पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश सो. यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील रेकॉर्डवरील गुन्हेगार, पाहिजे, फरारी, तडीपार व गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणा-या गुन्हेगारांना वेळोवेळी चेक करुन, त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करुन वचक निर्माण करणे बाबत सुचना व मौखिक आदेश दिल्याने, त्याअनुषंगाने दिनांक ०८/०१/२०२१ रोजी खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ यांच्या अधिपत्याखाली पोलीस उप-निरिक्षक श्री. महेंद्र पाटील, शाकीर जिनेडी, पोहवा ४०३ हजारे, पोहवा १९३२ कानगुडे, पोना ८७१ काटकर, पोना ११८१ पाटील, पोना ८८१ गोडांबे, पोना १०७१ बोटके, पोशि १९६१ मगर, व पोशि २७३७ गारगोटे असे रेकॉर्डवरील गुन्हेगार, पाहिजे, फरारी, तडीपार आरोपी व गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणा-या गुन्हेगारांची माहिती घेत पेट्रोलिंग करीत फिरत असताना, जाधव सरकार चौक स्पाईन रोड चिखली प्राधिकरण पुणे येथे आले असता, पोना संदीप पाटील व पोशि शैलेश मगर यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार रणजित चव्हाण हा त्याचे मित्रासह जगदंब कार वॉशींग सेंटर जवळ, जाधववाडी मोशी रोड चिखली प्राधिकरण पुणे येथे येणार असुन, त्याने अंगात पांढरे रंगाचे फुलबाहयाचे टि-शर्ट व निळया रंगाची जिन्स पॅन्ट असे कपडे घातलेले असुन, त्याचे जवळ पिस्टल सारखे हत्यार आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाली असता, सदरची बातमी त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ यांना कळविली असता, त्यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे, मिळालेल्या बातमीचे ठिकाणी सापळा लावला असता, काही वेळेनंतर मिळालेल्या बातमीतील वर्णनाप्रमाणे व पोलीसांचे रेकॉर्डवरील गुन्हेगार रणजित चव्हाण हा त्याचे एका मित्रासह पायी चालत येऊन, रस्त्याच्या कडेला कोणाची तरी वाट पाहत थांबलेले दिसले, ते पळुन जाणार नाहीत याची खबरदारी घेवुन, त्याना अचनाकपणे १७:३० वा. ताब्यात घेवुन, नांव पत्ता विचारता त्यांनी आपली नांवे १) रणजित बापु चव्हाण वय २६ वर्षे रा. वेताळनगर मोरया हौ.सोसा. रुम नं. २०९ चाफेकर चौक चिंचवड पुणे २) दत्तात्रय किसन गाडे वय ३५ वर्षे रा. मु.पो.येलवाडी ता.खेड जि.पुणे असे सांगितले. पंचासमक्ष त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचे कमरेला **प्रत्येकी १ प्रमाणे २ देशी बनावटीची पिस्टले, ०४ जिवंत काडतूसे असा एकुण किंमत ८०,८००/- रू**. चा माल मिळून आल्याने, तो जप्त करण्यात आलेला असून, त्यांचे विरुध्द **चिखली पोलीस ठाणे येथे भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५),महा. पो. ॲक्ट कलम ३७ (१)(३) सह १३५** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**आरोपी दत्तात्रय किसन गाडे हा आखिल भारतीय सेना या पक्षाचा खेड तालुका अध्यक्ष असुन, आरोपी रणजित बापु चव्हाण हा पोलीस रेकॉर्ड वरील गुन्हेगार असुन, त्याचे विरुध्द चिंचवड पोलीस स्टेशनला - १२ गुन्हे, निगडी पोलीस स्टेशनला - ०२ गुन्हे, वाकड पोलीस स्टेशनला - ०२ गुन्हे व वडगाव मावळ पुणे ग्रामीण पोलीस स्टेशन - ०१ गुन्हा असे खुन, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, दरोडा तयारी व शरीरा विरुध्दा अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.**

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे सो, पोलीस उप आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त श्रीमती प्रेरणा कट्टे मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ, पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील, शाकीर जिनेडी, तसेच पोलीस अंमलदार अशोक दुधवणे, गणेश हजारे, सुनिल कानगुडे, संदीप पाटील, शकुर तांबोळी, किरण काटकर, शैलेश मगर, निशांत काळे, आशिष बोटके, प्रदीप गोडांबे, सुधीर डोळस व अशोक गारगोटे यांचे पथकाने केली आहे.


पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय
खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा